मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार मा.न्या.श्री.पी.व्ही. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत दूसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या अंतरिम शिफारशी राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालय व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना / निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनधाराकांना दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: आयसीई-०८१८/प्र.क्र.७६/कामगार-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७/०५/२०१९

<u>वाचा</u>: १) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयसीई-११०३ /प्र.क्र.९१४९/कामगार-६, दि.१९/०३/२००५.
२) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयसीई-०४१२/ प्र.क्र.५५/कामगार-६, दि.२४/११/२०१४.
३) मा.सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.६४३/२०१५, दि.२७/०३/२०१८ चे आदेश.
४) शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.एचसीटी-१११८/प्र.क्र.३० /का.३,दि.२१/०६/२०१८.
५) अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र.आयसीएम/ आस्था-१/३०८/२०१८, दि.०६/१०/२०१८,

<u>प्रस्तावना:-</u>

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार केंद्र शासनाने राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशातील न्यायिक अधिकाऱ्यांच्या वेतन संरचना व भत्ते तसेच सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीनंतरचे इतर लाभ, इतर अनुषंगिक बाबींचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी दुसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोग स्थापन केला आहे. दुसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने (मा.न्या.रेड्डी आयोग) दि. ०९.०३.२०१८ रोजी अंतरिम वेतन अहवाल मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर केला.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्र. ६४३/२०१५ या न्यायालयीन प्रकरणांमध्ये दि. २७.०३.२०१८ च्या आदेशान्वये मा. न्या. श्री.पी.व्ही.रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली गठित दूसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या अंतरिम शिफारशी न्यायिक

अधिकाऱ्यांना/ निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांना लागू करण्याबाबत राज्य शासनास आदेशित केले आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने न्यायिक अधिकाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये ३०% वाढीव वेतन हे दि.०१.०५.२०१८ पासून व त्याबाबतची थकबाकी ही दि. ३०.०६.२०१८ पर्यंत देण्याबाबतही आदेशित केले आहे. त्यानुषंगाने राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालयातील व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना/ निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनधाराकांना दूसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाच्या अंतरिम शिफारशी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती:-

शासन निर्णय:-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२७.०३.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालयातील व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना/ निवृत्तीवेतनधारक न्यायिक अधिकाऱ्यांना व कुटुंब निवृत्तीवेतनधाराकांना दूसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाच्या अंतरिम शिफारशी दि. ०१.०१.२०१६ पासून लागू करण्यास शासन पुढीलप्रमाणे मंजूरी देत आहे:-

१) राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालयातील व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ पासून मुळ वेतनामध्ये ३०% वाढ देऊन नियमित वेतनवाढीसह अंतरिम वेतनवाढ देण्याची अंमलबजावणी दि.०१.०५.२०१८ पासून करण्यात यावी.

२) सदर वेतनवाढ ही स्वतंत्र गृहीत धरण्यात यावी. त्यावर कोणताही महागाई भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

३) थकबाकीची रक्कम खाली नमूद केल्याप्रमाणे प्रदान करण्यात यावी:-

अ) दि.०१.०५.२०१८ रोजी औद्योगिक व कामगार न्यायालयातील व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील ज्या न्यायिक अधिकाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते अस्तित्वात आहे त्यांना ६०% रोख व ४० % रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी.

ब) दि.०१.०५.२०१८ रोजी औद्योगिक व कामगार न्यायालयातील व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील ज्या न्यायिक अधिकाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते अस्तित्वात नाही, अशा न्यायिक अधिकाऱ्यांना थकबाकीची रक्कम रोखीने देण्यात यावी.

४) सेवानिवृत्तीवेतनधारक न्यायिक अधिकारी व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना देखील कार्यरत न्यायिक अधिकाऱ्यांप्रमाणे दि. ०१.०१.२०१६ पासून मूळ वेतनावर अंतरिम वेतनवाढ देण्यात यावी व त्याबाबतची थकबाकी सुध्दा त्यांना रोखीने देय राहील.

५) अंतरिम स्वरुपात वेतननिश्चिती केल्यानंतर आयोगाने वेतननिश्चितीबाबतचा अंतिम अहवाल सादर केल्यानंतर देय रकमा समायोजित करण्यात येतील. यासाठी होणारा खर्च त्या त्या वित्तीय वर्षांच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय विधी व न्याय विभागाच्या सहमतीने व अनौपचारीक संदर्भ क्र.६/२०१९, दि.०१/०४/२०१९ व वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र.७७/सेवा-४, दि.२२/०४/२०१९, अनौपचारिक संदर्भ क्र. २४२/२०१८/व्यय१६, दि.०५/०४/२०१९ व अनौपचारिक संदर्भ क्र. १५८/२०१९/सेवा-९, दि. २२/०४/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१७१४५२०४८६१० असा आहे. सदरचा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sudhir Govindrao Sugaonkar

Digitally signed by Sudhir Govindrao Sugaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f108fb5ef03e8283a578fa5070c7cb09619c46836c847e6978830f509fe2c0ee, cn=Sudhir Govindrao Sugaonkar
Date: 2019.05.17 15:59:53 +05'30'

(सुधीर सुगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
२) महाप्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक,
४) सह सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक,

५) अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई,
६) प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई,
७) महालेखापाल-१/२, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
८) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई,
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११) वित्त विभाग (सेवा-४/सेवा-९/व्यय-१६),मंत्रालय, मुंबई,
१२) विधी व न्याय विभाग, कार्यासन-३, मंत्रालय, मुंबई,
१३) निवड नस्ती (कामगार-६).